**नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,**

**वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग**

**ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com**

**बीड कृषी हवामान सल्ला** **मंगळवार, दिनांक – १८.०८.२०२०**

| हवामान घटक | हवामान अंदाज ( दिनांक १९ ते २३ ऑगस्ट, २०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १९/०८ | २०/०८ | २१/०८ | २२/०८ | २३/०८ |
| पाऊस | ०५.० | ०७.० | ०८.० | १०.० | ०९.० |
| कमाल तापमान (अं.से.) | २८.० | २८.० | २९.० | २९.० | २८.० |
| किमान तापमान (अं.से.) | २२.० | २२.० | २३.० | २३.० | २३.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८४ | ८५ | ८७ | ८९ | ९१ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६१ | ६५ | ६७ | ७० | ७७ |
| वा-याचा वेग (किमी / तास) | १९ | १९ | १६ | १८ | १३ |
| वा-याची दिशा | पश्चिम | पश्चिम | नैऋत्य | नैऋत्य | नैऋत्य |

| हवामानाचा इशारा | पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहील. तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. | |
|---|---|---|
| पिकांचे नाव | अवस्था | कृषि हवामान सल्ला |
| कापूस | पाते लागणे, फुलधारणा ते बोंड धरणे | सध्याचे ढगाळ वातावरण व आर्द्रता यामुळे कापूस पिकावरील जिवाणू करपा व केवडा (ॲन्थ्रॅक्नोज) रोगाच्या व्यवस्थापनासाठी शेतातील पिकांचे रोगट अवशेष गोळा करून नष्ट करावेत. रोगाची लक्षणे दिसल्यास कॉपर ऑक्सीक्लोराईड २५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून दोन ते तीन फवारण्या कराव्यात. सध्या पडत असलेल्या सततच्या पावसामुळे व साचलेल्या पाण्यामुळे आकस्मित मर (शारिरीक विकृतीची) लक्षणे दिसू लगताच तासात कोबाल्ट क्लोराईड १० पीपीएम (१० ग्रॅम प्रती लिटर पाणी) फवारणी करावी किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड (५० पीपीएम) २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्युपी १० ग्रॅम + युरीया १०० ग्रॅम + म्युरेट ऑफ पोटॅश १०० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात द्रावण करून प्रती झाडास ५०० मिली द्रावणाची आळवणी करावी. ८ ते १० दिवसानी २ % डीएपी २०० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी याची आळवणी करावी. कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी ५ गुलाबी बोंडअळीसाठीचे कामगंध सापळे लावावेत. सुरूवातीस ५% निंबोळी अर्काची फवारणी करावी, प्रादुर्भाव जास्त असल्यास प्रोफेनोफॉस ५० % ४०० मिली किंवा प्रोफेनोफॉस ४०% + सायपरमेथ्रीन ४% (संयुक्त किटकनाशक) ४०० मिली प्रती एकर आलटून पालटून पावसाने उघाड दिल्यास फवारावे. पाऊस झाल्यानंतर पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| सोयाबीन | पेरणी | पेरणीयोग्य पाऊस झालेल्या ठिकाणी जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करून बिजप्रक्रीया करून सोयाबीन पिकाची पेरणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| तुर | फांदया फुटणे | सध्या काही ठिकाणी पडत असलेल्या पावसामुळे व जमिनीतील पाण्याचा निचरा न झाल्यामुळे तुर पिकात मर रोगाचा (उमळणे) प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा करावा तसेच कॉपर ऑक्सीक्लोराईड ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाणी किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्युपी १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून आळवणी करावी. पाऊस झाल्यानंतर पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| मुग / उडीद | शेंगा पोसणे ते काढणी | सध्याचे ढगाळ वातावरणामुळे उशिरा पेरणी केलेल्या मुग / उडीद पिकात मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची किंवा डायमिथोएट ३०% २४० मिली प्रती एकर पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. तसेच वातावरणातील आर्द्रतेमूळे उशिरा पेरणी केलेल्या मुग पिकात भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी पाण्यात मिसळणारे गंधक ८० डब्ल्युपी २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्युपी १० ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल १० % ईसी १० मिली किंवा पेनकोनॅझोल १० % ईसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. वेळेवर पेरणी केलेल्या व काढणीस तयार असलेल्या मुग पिकाची तोडणी पावसाचा अंदाज बघून करावी. पाऊस झाल्यानंतर पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| भुईमूग | वाढीची / पेरणी अवस्था | वेळेवर पेरणी केलेल्या भुईमूग पिकात हलकी कोळपणी करावी. पाऊस झालेल्या ठिकाणी पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. भुईमूग पिकाची पेरणी ०७ जुलैपर्यंत करता येते. भुईमूगापासून अपेक्षित उत्पन्न मिळण्याची शाश्वती नसल्यास भूईमुग + तीळ (६ : २), भूईमुग + सुर्यफूल (६ : २), भुईमूग + कापूस (२ : १), भुईमूग + तुर (६ : २) या प्रमाणात पेरणी करून दोन्ही पिकांचे अधिक उत्पादन मिळते. |
| मका | वाढीची अवस्था | उशिरा पेरणी केलेल्या मका पिकावरील लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ % ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास वरील किटकनाशकांची आलटून पालटून फवारणी करावी. चा-यासाठी लागवड केलेल्या मका पिकाची कापनी ६५ ते ७० दिवसांनी करावी. पिक ५० टक्के फुलो-यात असताना मक्याची कापनी करावी. पाऊस झाल्यानंतर पेरणी केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| केळी | वाढीची अवस्था | केळी पिकात ढगाळ वातावरण व आर्द्रतेमूळे करपा (सिगाटोका) रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम ५० डब्ल्युपी १० ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल १० % ईसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्टिकरसह पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. जुनमध्ये लागवड केलेल्या बागेत ५० ग्रॅम नत्र प्रती झाड खतमात्रा दयावी. केळी बागेतील तणांचे व्यवस्थापन करावे. तणांचा प्रादुर्भाव जास्त असल्यास बागेत वापसा येत नाही, परिणामी रोगांचा प्रादुर्भाव वाढतो. पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| आंबा | वाढीची अवस्था | सध्याचे ढगाळ वातावरण व आर्द्रतेमूळे नवीन लागवड केलेल्या आंबा फळपिकात पानांवरील करपाच्या (ॲन्थ्रॅक्नोज) व्यवस्थापनासाठी कार्बेन्डाझिम १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| द्राक्ष | वाढीची अवस्था | सध्याचे ढगाळ वातावरण, आर्द्रता व पावसामुळे द्राक्ष बागेतील केवडा (डाऊनी मिल्ड्यु) रोगाच्या व्यवस्थापनासाठी पावसाने उघाड दिल्यास रोगनाशकाची फवारणी करावी. द्राक्ष बागेत पानांची विरळणी करावी. बगल फुटी काढाव्यात, द्राक्ष बागेत अन्नद्रव्याची कमतरता दिसून आल्यास ००:५२:३४ ७.५ किलो प्रती ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |

| | | |
|---|---|---|
| सिताफळ | फळवाढीची अवस्था | सिताफळ बागेत पिठया ढेकून किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास निंबोळी तेल ५० मिली किंवा व्हर्टिसीलीयम लॅकीनी जैवीक बुरशी ४० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर फळबागेत पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. बागेतील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| भाजीपाला | वाढीची अवस्था | सततच्या ढगाळ वातावरणामूळे भाजीपाला पिके उदा. टोमॅटो, भेंडी, मिरची, दोडके, भोपळा, कारली इत्यादी पिकांवर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास रोगट पालापाचोळा नष्ट करून शेत स्वच्छ ठेवावे व गंधक ८० % डब्ल्युपी २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० % डब्ल्युपी १० ग्रॅम किंवा प्रोपीकोनॅझोल २५ % ५ मिली किंवा मायक्लोब्युटॅनील १० % १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. पाऊस झाल्यानंतर भाजीपाला पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| फुलशेती | वाढीची अवस्था | ढगाळ वातावारणामुळे गुलाब फुलपिकावरील रसशोषन करणा-या किडींच्या व्यवस्थापनासाठी ५% निंबोळी अर्काची पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी. नवीन लागवड केलेल्या फुलपिकातील तणांचे व्यवस्थापन करावे. पाऊस झाल्यानंतर लागवड केलेल्या पिकात पाणी साचणार नाही याची दक्षता घ्यावी. पिकातील अतिरीक्त पाण्याचा निचरा होईल अशी व्यवस्था करावी. |
| पशुधन व्यवस्थापन | -- | लम्पी स्कीन डिसीज सदृश रोग गोवर्गीय व म्हैसवर्गीय पशुधनामध्ये दिसुन येत आहे. हा साथीचा विषाणुजन्य रोग असुन याचा प्रसार मुख्यत्वे रक्त पिपासु चावणा-या किटकवर्गीय माशा, डास, गोचीडे यामुळे होतो. याच्या व्यवस्थापनासाठी रोग बाधीत पशुधन निरोगी पशुधनापासून विलगीकरण करावे अथवा त्यांना एकित्रत चरावयास सोडु नये. रोगबाधीत पशुधनाची ने-आण बंद करावी. तसेच साथीच्या काळात गावातुन / परिसरातुन गोठयास भेटी देणा-याची संख्या मर्यादीत करावी. बाधीत पशुधनाची सुश्रुषा करणा-या पशुवैदयक डॉक्टरांनी विशिष्ट पोशाख परिधान करावा व सुश्रूषेनंतर हात अल्कोहोल मिश्रीत सॅनीटायझरने धुवून टाकावेत तसेच पादत्राने व पोशाख, गरम पाण्याने निंर्जतुक करून घ्यावा. बाधीत पशुनाच्या संपर्कामध्ये आलेले वाहन व परिसर तसेच ईतर साहीत्य निर्जतुक करावे. रोग नियंत्रणासाठी रक्त पिपासु चावणा-या किटकवर्गीय माशा, डास, गोचीडे यांचे निर्मुलन करावे. पशुधन व परीसरावरती रासायनिक / वनस्तपीजन्य किटकनाशकाची फवारणी करावी. |

**सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.**